| MHKO200004422022 | नियमीत दिवाणी दावा क्र. ११६/२०२२<br>नि.२३ खालील आदेश<br><br>श्री.संजय केरबा इंजुळकर विरुध्द श्री. लक्ष्मण पांडूरंग जाधव |
|---|---|

वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. वादी यांनी दावा मिळकतीचे मोजणी करीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती होणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**०२.** मौजे कसबा कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील गट नं. १२८० क्षेत्र ००.२१ आर. आकार ३.४४ पैकी क्षेत्र ००.०५ आर. त्याच्या चतु:सिमा सदर अर्जात नमुद केल्या आहेत. सदर मिळकत ही मुळची प्रतिवादी क्रं. १ यांचे मालकीची होती ती मिळकत वादी यांना प्रतिवादी क्रं. १ ने दि.१५.१०.२०११ रोजीचे कराराने कायम मालकी हक्काने दिली आहे. तसेच गट नं. १२८३ व प्रतिवादी क्रं.१ यांचे मालकीची गट नं. १२८० व श्री. दत्तात्रय शंकर पाटील यांचे मालकीची गट नं. १२७८ या शेत मिळकती एकमेकांना लागून आहेत. सदर तिन्हीही शेत मिळकतीना ये-जा करण्यासाठी तसेच त्यामध्ये कष्टमशागत व वहिवाट करुन पिके घेण्यास सुलभता व्हावी यासाठी तीन्हीही गट नंबरचे शेत मिळकतीतुन एकमेकांना रस्ता देण्याचे ठरविले त्याप्रमाणे दि. १५.१०.२०११ इ. रोजी आपसांमध्ये वाट व रस्त्याबाबत अदला बदल करारपत्र एकमेकांना लिहून दिले. सदर कराराने वादी यांनी प्रतिवादी क्रं. १ यांना रक्कम रु. ५०,०००/- मोबदला दिला आहे.

**०३.** वर नमुद केल्याप्रमाणे वादी यांनी त्यांचे गट नं. १२८३ पैकी ०६.३२ गुंठे क्षेत्र त्याची लांबी पूर्व-पश्चिम ८४ फुट व दक्षिण-उत्तर ८१ फुट रुंद असे एकूण ६९३० फुट क्षेत्र प्रतिवादी क्रं. १ यांना कायम मालकी हक्काने दिले.

त्यांच्या चतु:सिमा अर्जात नमुद केल्या आहेत. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली दावा मिळकत प्रतिवादी क्रं. १ ला वादी यांनी कायम मालकी हक्काने दिली आहे. त्याप्रमाणे वादी व प्रवितादी नं. १ कायम मालकी हक्काने उपभोगत आहे. वर नमुद तीन्ही मिळकती हे गट एकमेकास लागून असलेचे तसेच त्या मध्ये वहिवाटीचा रस्ता असलेचे प्रतिवादी क्रं. १ ने अमान्य केले आहे. तसेच दि. १५.१०.२०११ इ. रोजीचे अदलाबदपत्र झाले नसले बाबतचे कथन केले आहे. त्यामुळे त्याबाबतची सत्य व खरी वस्तुस्थिती नाकारले मुळे वादी यांना दावा मिळकती मधील रस्त्याबाबत कोर्ट कमिशन होऊन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. तसेच सदर कोर्ट कमिशन झालेस दावा मिळकती मधील वाट व रस्त्या बाबतची सत्य व खरी वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर येणार आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.२४ वर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा, लबाडीचा असून तो प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. प्रतिवादी यांनी वादींना कोणताही करार लिहून दिलेला नाही. तसा कोणताही करार अस्तीत्वात नाही अथवा तो प्रवितादी यांनी लिहून दिलेला नाही. प्रतिवादी यांचे मालकी व वहिवाटीची मिळकतीतील हिस्सा व क्षेत्र वादीने दांडगाव्याने व धमकी देऊन काढुन घेतला असून या अतिक्रमीत असे काही क्षेत्राचा कथील कब्जा हा पुर्णत: बेकायदेशीर आहे. तसेच वादीने प्रतिवादी यांना कोणताही मोबदला दिलेला नाही अथवा वादीने त्यांचे मालकीचे कोणतेही क्षेत्र अदला बदल अथवा तबदिल केलेले नाही. वास्तविक सरबांधावरुन रस्ता करणेसाठी महाराष्ट्र जमिन अधिनियम मध्ये तरतुदी असताना मे. न्यायालयात मजकुरी दाद मागणी करणेचा अधिकार वादींना नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. वास्तविक वादींनीच प्रतिवादी व अन्य सहहिस्सेदारांची जमिन मिळकती हडप केल्या आहेत. वादी यांनी सदरचा अर्ज पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने दाखल केला आहे. त्यामुळे तो खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०५.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीनी दावा कायम मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्रं. १ यांनी अदलाबदल करारपत्र केलेचे व त्या अनुषंगाने मिळकतीती येणे-जाणेसाठी गट नं. १२८०, १२८३ व १२७८ या एकमेकास लागून असल्याच्या व त्यामध्ये वहिवाटीचा रस्ता असल्याचे प्रतिवादी क्रं. १ यांनी अमान्य केले आहे. त्यामुळे दाव्यातील खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत दोन्ही पक्षकारांमधील वाद संपुष्टात येण्याकरीता तसेच न्यायालयास योग्य त्या निष्कर्षापर्यंत पोहचण्याकरीता दावा मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश.</u>**

०१. सदरचा अर्ज मंजूर करणेत आला आहे.

०२ सदर कामी कोर्ट कमिशनर विधीज्ञ श्री. व्ही.एस.पाटील यांची नेमणूक करणेत आली आहे.

०३. न्यायालयीन आयुक्त यांनी कळे, ता. पन्हाळा येथील गट नं. १२८०,१२८३ व १२७८ हे गट एकमेकास लागून असलेने त्यामध्ये वहिवाटीचा रस्ता आहे किंवा कसे त्याबाबत पाहणी करुन तसे नकाशामध्ये दर्शवून, पंचनामा करुन तसा नकाशा व वस्तुस्थितीचा अहवाल या न्यायालयाकडे सादर करावा.

४. वादी यांनी न्यायालयिन आयुक्त यांचे शुल्क रक्कम रु. ५,०००/- कार्यालयात भरावे.

VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.05.08 17:34:51 +0530

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
कळे-खेरीवडे.

कळे-खेरीवडे.
दि. ०८.०५.२०२५.